# मुलांना कसे वाढवावे? ओशो म्हणतात ?

ओशो उर्फ भगवान श्री. रजनीश हे माझे आवडते तत्त्वज्ञ - विचारवंत , वक्ते व लेखक. केवळ काळाच्या पुढचा विचार ते मांडतात असे नाही, तर ते जागतिक जीवनाला तर्कसुसंगत असा विचार नेहमी मांडतात. जग आजही ज्या निरर्थक रूढी-परंपरांच्या बेड्यात अडकले आहे. त्याची रास्त जाणीव करून देऊन, समाजाला मानसिकरित्या बाहेर काढतात. त्यांचे लेखन जसजसे वाचत जावे तसतसे ते पटत जाते; आणि जसजसे पटत जाते तसतसे ते व्यवहारांत उतरवावे असे वाटू लागते. त्यांची प्रभावी, कमालीची तर्कशुद्ध आणि वेळोवेळी गोष्टींचे दाखले  देत आणि क्वचित विनोदाची पसरण करणारी आकर्षक भाषा आपल्याला खिळवून ठेवते.

भगवान रजनीश यांचा, १९ फेब्रुवारी ते ५ मार्च १९८६ असा दोन आठवडे मुक्काम ग्रीस देशात होता. या काळात रोज सकाळ संध्याकाळ अशी दोन प्रश्नोत्तररूपी भाषणे होत होती. ऐकणारे श्रोते- त्यांचे शिष्य-संन्यासी विविध प्रश्न विचारीत आणि त्यांची सविस्तर उत्तरे भगवान रजनीश देत असत. २० फेब्रुवारी सकाळच्या सत्रात त्यांना मुलांबाबतचा एक प्रश्न विचारला गेला. प्रश्न असा होता की, ‘मुले वाढविण्यात होणाऱ्या मुख्य चूका कोणत्या?’ त्याला दिले गेलेले उत्तर हे बालशिक्षणात काम करणाऱ्यांना आणि इतरांनाही काही शहाणपण देणारे आहे.

भगवान रजनीश म्हणतात:

“मुले वाढताना होणाऱ्या प्रमुख चुका अनेक आहेत; पण मी त्यातल्याही अत्यंत महत्त्वाच्या चुकांविषयी बोलतो. पहिली गोष्ट अशी की मुले आपल्या मालकीची आहेत, असे मानणे. ती तुमच्यापासून निर्माण होतात, पण ती तुमच्या मालकीची नसतात. ती तुमची मालमत्ता नव्हे,  पण ही आपली मालमत्ता आहे असे मानल्यामुळेच, खूप चुका घडतात.

मालमत्ता मानल्यामुळे मुलांचे रूपांतर तुम्ही वस्तू मध्ये करता, कारण वस्तूच फक्त मालकीच्या असू शकतात, माणसे नव्हेत. ही अत्यंत क्रूर गोष्ट आहे; आणि बिचारी  दुर्बळ मुले, याविरुद्ध बंडही करू शकत नाहीत, ती तुमच्यावरच अवलंबून असतात, ती तुम्ही म्हणाल ते स्वीकारतात. आपली मालमत्ता जतन करण्यासाठी, जन्मताक्षणीच तुम्ही त्यांना ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम, बौद्ध, जैन, शीख, ज्यू इत्यादी करता.

राजकीय क्षेत्रात, माणूस प्रौढ झाला, एकवीस वर्षाचा झाला की तुम्ही त्याला मताधिकार देता, मग धर्म ही काय याहून कमी दर्जाचा आहे काय?  मुलाला पुरती भाषाही कळत नसते आणि तुम्ही त्याला सांगता की, तू 'ज्यू' आहेस, आणि चक्क त्याची सुंथा करता त्याची परवानगी न घेता. बरोबर आहे कारण तुमच्या घरातील फर्निचरची तुम्ही कुठे परवानगी घेता हे ती घेताना, ठेवताना किंवा टाकून देताना, असेच वागता तुम्ही तुमच्या मुलांशी, वस्तूप्रमाणे.

पालक खरंच जागरूक असतील तर ते थांबतील, मूल मोठे होइपर्यंत, ते मोठे होईल स्वतःची निवड स्वतः करील.  त्याला जो धर्म स्वीकारायचा आजे तो, त्याला स्वीकारता येईल.

मला तर असे वाटते की, राजकीय क्षेत्रात किमान वय एकवीस मानले जात असेल तर धर्माच्या बाबतींत ते बेचाळीस मानले पाहिजे, निवड करायला. कारण, या वयाला धर्म ही गोष्ट महत्त्वाची ठरते. तुमचे काही आयुष्य जगून झाले आहे; तुम्ही अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले आहेत. त्यामुळे बेचाळीस वय हा एक चांगला कलाटणी बिंदू आहे. आपल्याला आहे तसेच सांगायचे आहे की, आपल्या जगण्याला काही नवे परिमाण द्यायचे आहे; हे नवे परिमाण म्हणजे धर्म.

व्यक्तीने, आपण फक्त धार्मिक राहायचे ठरवले, कोणत्याही धर्माशी जखडून घ्यायचे नाही असा निर्णय घेतला, तर तो ठीकच आहे. त्याने स्वातंत्र्याची निवड केली आहे. ती त्याची व्यक्तिगत निवड आहे, त्यात कुणीच हस्तक्षेप करू शकत नाही.

कुणीही बाळ जन्माला येताना ज्यू, ख्रिश्चन किंवा हिंदू म्हणून जन्माला येत नाही. प्रत्येक बाळ एक कोरी पाटी म्हणून जन्माला येते. त्यावर काहीच लिहिलेले नसते, निव्वळ निरागस असते ते.

पहिली गोष्ट लक्षात घ्या, तुम्ही तुमच्या मुलांना 'वस्तू' मानून तुमच्या कोणत्याही कृतीने इतक्या खालच्या दर्जाला नेऊ नका. त्याला 'व्यक्तिगतता' (Individuality) द्या, त्याच्यावर 'व्यक्तिमत्त्व' (Personality) लावू नका. व्यक्तिगतता ही आपण बरोबरच घेऊन येतो. व्यक्तिमत्त्व मात्र पालकांकडून, समाजाकडून, शिक्षणव्यवस्थेकडून लादले जात असते.

तुम्हाला नीट समजले तर तुम्ही मुलावर काहीही लादणार नाही. उलट, त्याला 'तोच' होण्यासाठी मदत कराल. हे होणे कठीण आहे. त्यामुळे पूर्वपार समाजाने सोपे मार्ग अवलंबले आहेत, कारण मुलावर काहीतरी लादणे सोपे आहे, असे केल्याने तो आज्ञाधारक बनतो. म्हणजे तो बंडखोर बनत नाही. आता तो तुम्हाला काही त्रास देत नाही. पण तुम्ही त्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलेत, त्याला स्वतंत्रता आणि 'स्व'त्व दिलेत तर अनेंक बाबतींत तो तुम्हाला त्रास देईल. लोकांनी, त्याचे त्रास सहन करण्यापेक्षा, स्वतःच्या मनशांतीसाठी नष्ट करण्याचाच मार्ग स्वीकारलेला आहे. जन्म देऊन नष्ट करण्यापेक्षा जन्म न देणेच चांगले.

मानवी समाजात, मुले ही सर्वात जास्त गुलामीत असलेला, सर्वात जास्त पिळवणूक होणारा असा वर्ग आहे. आणखी मुख्य म्हणजे त्यांच्यासाठी त्यांची पिळवणूक केली जातेय.

आज्ञाधारकपणा हा असाच एक, मुले वाढविण्याबाबतचा चुकीचा पायंडा पडला आहे. वास्तविक बुद्धिमत्ता, बंडखोरपणा यांच्या पायांवर मुलांना वाढविले पाहिजे. जेव्हा असली बुद्धी सांगेल तेव्हाच बालकाने 'हो' म्हटले पाहिजे, अन्यथा त्याने 'नाही' म्हटले पाहिजे. आणि हो किंवा नाही जे काही असेल त्याचा आवर

केला पाहिजे. तो एका अपरिचित अशा जगातून, तुमच्याकडे पाहुणा म्हणून आला आहे; हे जग त्याला सर्वस्वी नवीन आहे. त्यामुळे त्याला पाहुण्यासारखे, मित्रासारखे वागवा, आणि तसे तुम्ही वागा. त्याच्या हो, नको चा आदर ठेवा नाहीतर आपणच त्याला केवळ 'हो जी' करून ठेवू. ही अध्यात्मिक गुलामगिरी आहे.

मुलांना मोठ्या आदराने वागवले गेले पाहिजे. परंतु सगळेच समाज नेमके याच्या उलट करतात. ते मुलांनाच शिकवत आले आहेत, मोठ्यांचा आदर करायला, आई-वडिलांचा आदर करा, मोठ्यांचा आदर करा, आजी-आजोबांचा आदर करा. हा मलाच पडलेला एक मोठा प्रश्न आहे. भारतात एक कुटुंब पध्दती आहे. माझ्या घरात तर साठ माणसे होती. सर्वच माझ्यापेक्षा मोठी; त्यामुळे त्यांच्या पाया पडणे, हाच एक नित्य नेमाचा उद्योग होऊन बसला होता. एकदा मी माझ्या वडिलांना सरळ सांगून टाकले. 'आता वाटते' वडील म्हणाले, 'त्यामुळे मोठी अडचणच उद्भवेल.' मी म्हटले 'तो तुमचा प्रश्न आहे, 'माझा प्रश्न मी सोडविला आहे'!'. ज्याच्याविषयी मला आदर वाटेल, खूप खोलवरचे प्रेम वाटेल, त्यांच्या पायांना मी स्पर्श करेन. पण ज्यांच्याविषयी मला काहीही वाटत नाही, त्यांच्या पाया मी का पडू?

पण अशी प्रथा आहे. तिकडे मुलांना वाढविण्याची. म्हाताऱ्या माणसांचा आदर करा. का? ते केवळ वृद्ध आहेत म्हणून? वृद्धत्वात आदरणीय असे काय असते?

आणखी असेच एक तर्कट आहे. मृत व्यक्तींचा आदर करा. जे हजारो वर्षांपूर्वीच मृत झालेले आहेत. त्यांचा तर आणखीनच आदर करा. तुम्ही उगवत्या सजीव पानाला सांगताय की, वाळून जमिनीवर पडलेल्या मृत पानांचा आदर करायला सांगताय.

मुलांना वाढविण्याच्या योग्य पद्धतीत, वृद्धांचा नव्हे, तर मुलांचा आदर करायचाय, कारण, वृद्धांना नाही तर यांना दीर्घकाळ जगायचे आहे.

मुलांच्या आदराचा अगदी परिसासारखा परिणाम होतो. जर मुलांविषयी आदर भाव असेल तर तो आदरच त्यांना अनेक गोष्टींपासून परावृत्त करेल, कारण, ते त्याच्या प्रतिमेच्या विरुद्ध जाईल. उलट, या आदरापोटीच, एरवी केल्या नसत्या अशा अनेक गोष्टी तो करायला धजेल. आपल्या या आदराला पात्र ठरण्याचा त्याचा प्रयत्न राहील. पण आज मात्र सगळं उलटे-पालटे झाले आहे.

आणखी एक गोष्ट अशी की, मुलांची काळजी घ्यावी लागते. त्यांना तुमची मदत लागते. पण ती तुमच्यावर अवलंबून राहता कामा नये. तुमची त्यांना खरी मदत होणार आहे ती स्वावलंबी होण्यासाठी. तुमची खरी मदत कोणती असणार आहे तर ती म्हणजे त्यांना तुमची मदत लागू नये.

ती मुले या जगात नवीन आहेत. तुम्ही त्यांच्यावर नजर ठेवली पाहिजे, जेणेकरून ती खड्डयात पडणार नाहीत. पण खड्ड्यांपासून वाचविण्यासाठी त्यांना गुलाम करून ठेवण्याची गरज नाही. जर हे दोनच पर्याय उपलब्ध असतील, तर मी खड्ड्याचीच निवड करीन, कारण खड्ड्यात पडल्यामुळे तरी ती काही शिकतील. ते शिकतील खड्डे कसे असतात, पुन्हा त्यात पडू नये हे ते शिकतील. पण आयुष्यभर गुलामी, आयुष्यभर संरक्षण यांतून मुले शिकायलाच निरुपयोगी ठरतात.

मुलांना शाळांमधून अगदी प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण द्या. लेखन-वाचन-गणन, स्व-भाषा, एखादी आंतरराष्ट्रीय भाषा-जी जग एकत्र करील, इ. तुम्ही पाहाल जवळ-जवळ सगळयाच मुलांची अक्षरे किती वाईट असतात. त्यांच्या लेखनाकडे कोणी लक्षच देत नाही. आपले लेखन ही आपली ओळख असते, आपले सर्व व्यक्तिमत्त्व त्यातून व्यक्त होते. त्यात एक ताल आहे, कला आहे, हे खरे प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण आहे. त्यानंतरच्या टप्प्याला, मानस विश्लेषक, मानसशास्त्रात आणि शिक्षक यांनी सतत मुलांचा अभ्यास चालू ठेवला पाहिजे. त्यांच्यातील सूक्ष्म क्षमता शोधून काढल्या पाहिजेत. अशा अभ्यासातून एखादे मूल पुढे काय होईल ते स्पष्ट होईल. आज सगळा सावळा गोंधळ आहे. चित्रकार पायतणे बनवतोय तर पायतणे करू शकणारा चित्रकारिता करतोय.  प्रत्येकजण अशा ठिकाणी आहे की जेथे तो असू नये. आज सगळया जगाचीच दुर्दशा झाली आहे. जगातील नव्वद टक्के लोक अशा खिन्नतेत आहेत, ते तळमळताहेत, कारण प्रत्येकजण दुसऱ्या कुणाचे तरी काम करत आहे, त्यात तो स्वतःचे पूर्ण मन ओतू शकत नाही,  आणि साहजिकच आहे की तो आजिबात आनंदी नाही.

त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांनी काय करावे, कुठे जावे हे ठरवू नये. ते ठरवतील मानसविश्लेषक, मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षक. आज पालकच ठरवताहेत मुलांनी कोणती नोकरी करावी,  कोणता व्यवसाय करावा. हे काही मुलांच्या क्षमता पाहून ठरविले जात नाही, ते असते पैशांसाठी, मान- सन्मानासाठी,आर्थिक संपन्न जीवन जगण्यासाठी. त्यांचे हेतू फारसे वाईट नाहीत, पण ते सहहेतूंनी मुलांसाठी नरकाचा मार्ग आखून देत आहेत. प्रश्न त्यांच्या हेतूंचा नाहीये, प्रश्न मुलांच्या सूक्ष्म क्षमतांचा आहे.

आपण, मुलांचा शोध घेऊ या, त्याच्यात काय लपले आहे ते शोधू या, आणि त्याला त्या दिशेने जायला देऊ या. क्वचित तो श्रीमंती जीवन जगणार नाही, पण समाधानाचे जीवन मात्र जगेल.

प्रत्येक मूल योग्य ठिकाणी पोचेल असे पाहू या. आज प्रत्येकजण चुकीच्या ठिकाणी आहे. त्यामुळे कुणीच आनंदी समाधानी नाही. आणि या सगळयाची जबाबदारी आहे ती आपण मुलांना वाढवायला कशी सुरुवात करतो यावर!

❖